# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 19 ( ) तरूणींनी स्वतःकडून अपेक्षा व्यक्त करायला, स्वतःवर प्रेम करायला शिकायला हवे मात्र स्वतःवरचा विश्वास कमी होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या गुंजन गोळे-तळेगावकर (अमरावती) यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने मुलींचे वसतिगृह क्रमांक 1 येथे आयोजित सहकार महर्षी कै.प्रल्हादराव पाटील व्याख्यानमालेत स्त्रीयांचे सामाजिक भान या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप रामू पाटील होते. संत मुक्ताबाई इस्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी,जळगावचे अध्यक्ष ॲड रवींद्र पाटील यांनी दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. तब्बल दीड तासाच्या आपल्या व्याख्यानातून गुंजन गोळे यांनी सामाजिक कार्यातील अनुभव विद्यार्थिनींसमवेत शेअर केले. वैयक्तिक परीक्षेत चांगले गुण प्राप्त कराच मात्र जीवनाच्या परीक्षेतही मेरीट मध्ये या असे सांगताना पंधराशे लोकसंख्येच्या गावातून माझ्यासारख्या तरूणीला मोठा संघर्ष करावा लागला असे त्या म्हणाल्या. शारीरिक सौंदर्यावर न भावता आतून सुंदर राहण्याचा प्रयत्न करा, स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करा, लोकं काय म्हणतील याचा विचार न करता आपल्याला आतून काय वाटते याचा विचार करा असे सांगताना त्यांनी शेतकरी आणि सैनिक यांची जाणिव तरूणाईने नेहमीच ठेवायला हवी कारण त्यांच्यामुळेच आपण सुरक्षीत आहोत असे श्रीमती गोळे म्हणाल्या. मनोरूग्ण, अनाथ, एचआयव्ही बाधित यांच्यासाठी त्या अमरावतीमध्ये काम करतात. हे काम करतानांचे अंगावर शहारे येणारे अनुभव त्यांनी कथन केले.

अध्यक्षीय भाषणात गुंजन गोळे यांचा आदर्श मुलींनी स्वीकारावा असे आवाहन करताना दिलीप पाटील यांनी महिलांमध्ये सामाजिक कार्याची उपजत आवड असते ती वृध्दींगत करण्याचे आवाहन केले. प्रारंभी जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ.मनिषा इंदाणी यांनी सुत्रसंचालन आणि प्रा.मधुलिका सोनवणे यांनी आभार मानले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 19 सप्टेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in